**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२२/२०२२-२३/०५/वेतनपथक, पुणे दिनांक – २१ जुलै, २०२२

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,

विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

डेक्कन महाविद्यालय व पदव्यत्तर सस्था, पुणे

**विषय - वेतन अनुदान माहे जुलै - २०२२.**

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील माहे जुन, २०२२ चे वेतन अनुदानाची विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती तयार करुन त्याप्रमाणे सदरहू माहिती एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावी **आणि त्याची हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी खाली नमूद केलेल्या तारखेला व वेळेतच सादर करावी.**

**तसेच विवरणपत्र क्रमांक ०७ खालीलप्रमाणे सुधारित करण्यात आलेले असून त्याप्रमाणेच माहिती सादर करण्यात यावी.**

माहे जुलै, २०२२ या महिन्याचे वेतन देयक नियमीत पद्धतीने ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने तयार करण्यात येऊन फॉरवर्ड/सादर करावे.

**जे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये सेवानिवृत्त होणार आहेत त्यांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणीची रक्कम कपात करण्यात येऊ नये.**

**माहे जुलै, २०२२ या महिन्याच्या वेतनापेक्षा माहे जुलै, २०२२ या महिन्याचे वेतन देयकामध्ये वेतननिश्चितीमुळे ज्या कर्मचा-याच्या वेतनामध्ये फरक पडला आहे त्यांच्या वेतननिश्चितीच्या पीडीएफ मधील प्रती देखील जुलै,२०२२ या महिन्याच्या वेतन देयकासोबत खाली नमूद केलेल्या तारखेला व वेळेतच सादर करण्यात याव्यात.**

उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेऊन माहे जुलै, २०२२ च्या वेतन देयकासाठीची एचटीई सेवार्थ प्रणालीमधील **Outer** आणि **Inner** ची प्रत आणि **०१** ते **०७** या विवरणपत्राची माहिती Microsoft Excel मध्ये Times New Roman या फॉन्टमध्ये विवरणपत्रे सादर करण्यात यावी. **माहे जुलै, २०२२ चे वेतन देयकासोबत खालील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.**

**उपयोगिता प्रमाणपत्र**

**प्रमाणित करण्यात येते की खाली नमूद केलेली माहिती अचूक असून त्याची खात्री मी स्वतः यासाठीच्या आवश्यक असणा-या सर्व नोंदवहया तपासून करुन घेतली आहे. यामध्ये काही चुक आढळल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील.**

| अ. क्र. | महिना | तपशील | सहसंचालक पुणे यांचेकडून बँक ऑफ महाराष्ट्रच्या वेतन खात्यामध्ये जमा केलेली रक्कम | प्रत्यक्ष वितरीत रक्कम | शिल्लक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| | | **एकूण** | | | | |

तरी उपरोक्त बाबी विचारात घेऊन आपण आपले महाविद्यालय/अकृषी आणि अभिमत विद्यापीठाचे माहे जुन ,२०२२ चे वेतन देयक एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये फॉरवर्ड करावे आणि अशा ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने तयार केलेल्या वेतन देयकाची विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती खाली नमूद केलेल्या तारखेला व वेळेतच सादर करण्यात याव्यात.

प्राचार्य पदास विद्यापीठ मान्यता (Approval) असलेल्या महाविद्यालयानीच माहे जुलै,२०२२ चे वेतन सादर करण्यात यावे. तसेच ज्या शिक्षक कर्मचा-यांना आज अखेर पर्यत विद्यापीठ मान्यता मिळालेली नाही किंवा प्रथम वेनत निश्चिती झालेली नाही अशा अध्यापकीय कर्मचा-यांचे वेतन देयके सादर करण्यात येवू नये. तसेच शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या बाबतीत ज्या शिक्षकेत्तर कर्मचा-याची नियुक्ती वेळी ना-हरकत पत्र/जाहिरात/प्रथम वेतननिश्चिती झालेली नाही अशा कर्मचा-यांचे सुध्दा वेतन देयके वेतन बिलासोबत सादर करु नये, याची सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

**तसेच वाहतुक भत्ता फरकाची रक्कम ही माहे जुलै, २०२२ च्या वेतनासोबतच दर्शविण्यात यावी. सदर रक्कम ही एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये Other Allowances या Tab खाली कर्मचारीनिहाय दर्शविण्यात यावी.**

तरी वरील सर्व सूचना विचारात घेऊन आपण वरील बाबींवरील आपले प्रस्ताव **बी.एम.सी.सी. कॉलेज पुणे** खाली नमूद केलेल्या तारखांना व वेळेत सादर करावेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | २२ जुलै, २०२२ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० |
| २ | अहमदनगर | २२ जुलै, २०२२ | दुपारी २.०० ते सायंकाळी ५.०० |
| ३ | नाशिक | २५ जुलै, २०२२ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० |
| ४ | पुणे जिल्हा | २५ जुलै, २०२२ | दुपारी २.०० ते सायंकाळी ५.०० |

**सही/-**
(डॉ. किरणकुमार बोंदर )
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे